International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# कोलाम जमातीचे आर्थिक जिवन

**पल्लवी पुरुषोत्तम कोटंबे[1], प्रा. डॉ. प्रतिभा एस. काळमेघ[2]**
*[1]अर्थशास्त्र विभाग, भाऊसाहेब भोरे शिवशक्ती महाविद्यालय बाभुळगाव, जी यवतमाळ*
*[2]मार्गदर्शक, विभाग प्रमुख अर्थशास्त्र विभाग.*
*भाऊसाहेब भोरे शिवशक्ती महाविद्यालय बाभुळगाव, यवतमाळ*
*Corresponding Author – पल्लवी पुरुषोत्तम कोटंबे*
**DOI - 10.5281/zenodo.15240988**

**प्रस्तावना :**

कोलाम ही जमात इतर बहुतेक आदिवासींप्रमाणे 'वन्य' आहे. तिचा उल्लेख ब्रिटिश राजवटीच्या कागदपत्रांमध्ये 'वन्य जमात' म्हणुन केल केला जात असे. महाराष्ट्रात यवतमाळ या जिल्ह्यामध्ये या जमातीचा उगम आहे. व यवतमाळ जिल्हा गॅझिटिअर मध्ये जंगली जमातींचा (Forest Tribes) जो एक वर्ग पडला आहे त्यात गोंड, कोळी, आंध आणि प्रधान यांच्या बरोबर कोलामांचाही समावेश करण्यात आला आहे. रसेल - हिरालाल यांनीही या जातीचा उल्लेख. 'वन्य व शेतकरी' असा केलेला आहे.

प्राचीन काळा पासून जंगलाच्या सानिध्यात - जंगली उत्पन्नावर जगण्याची या जमातीची धडपड आजही कायम आहे. आज मात्र केवळ, जंगली उत्पनावर जगणे अशक्य असल्यामुळे बहुसंख्य कोलाम शेती किंवा शेतमजुरी करुन जगतात. सुरुवातीच्या जंगली कामांकडून ते हळूहळू शेती कडे वळत गेले. शेती व शेतमजुरी करताकरता आज त्यांचा तो उपजीविकेचा मुख्य धंदा झाला आहे.

कोलाम जमातीची प्रसिद्धी कष्टाळू जमात म्हणून होते. कोलाम स्त्रिया पुरुषांपेक्षाही अधिक कष्टाळू वृत्तीच्या आहेत. कोलाम जमातीमध्ये सर्व वयोगटातील लोक कामे करतात. याचाच अर्थ असा कि, 14 वर्षा पेक्षा कमी वयाची मुलेही कामधंद्याला लागलेली असतात एवढे कष्ट करणारा वर्ग आर्थिक दृष्ट्या मागासलेला असण्याची कारणे शोधने आवश्यक असुन त्याच्या व्यवसायाच्या स्थितीतच ती निहित आहेत. त्याच्या व्यवसायांचे विश्लेषण व विवरण केल्यास काही निष्कर्ष हाती लागु शकतात.

**शेती :**

कोलाम लोक प्रथम डोंगराच्या उतरणीवर 3-4 घरांनिशी स्थिर होत गेले. तीथेच त्यांनी उतरणीच्या डोंगराळ आणि पठारी जमिनीवर शेती करण्याची सवय लावुन घेतली. भूमातेवर त्यांचे अपार प्रेम जमिनीच्या पोटात औजार खुपसून पिके घेणे त्यांना खपणार कसे? तर ते काय करायचे, बी फेकले की पुन्हा जंगली व इतर कामांसाठी हे लोक मोकळे असत. तीळ मटकी, मुग या सारखी हलकी धान्ये उगवण्यासाठी उतरणीची जागा चांगली असते आलेल्या पिकांची राखण करून वर्षाच्या शेवटी हाती आलेले धान्य घरी आणावयाचे, पण या पद्धतीने धान्य पिकुन विकून किती पिकणार? केवळ शेती करून व पिके पिकवुन जगणे कठीणच!

पुढे काही कोलामांनी धरणीवर औजारे चालविण्यास अप्रत्यक्षपणे सुरुवात केली. पुढपुढे कुदळी, फावडी अशा हलक्या अवजारांनी स्वणण्यासाठी हे लोक तयार झाले. असे खुप शतका

पर्यंत चालले. मात्र एका जमीनीला इतर आदिवासीप्रमाणेच हेही लोक कधी चिकटून राहत नसत. धरतीमातेला पुन्हा पुन्हा फाडून - खणुन त्रास देणे यांच्या भावनेला पटेना 2-3 वर्षांनी आपली जमीन सोडून दुसऱ्या जमिनीचा हे शोध घेत व तेथे शेती करीत. शेती बदलविण्याची ही पध्दती 'शिफ्टिंग कल्यवेशन' या नावाने ओळखली जाते. या पद्धतीला आसमात 'झुम' आणि ओरीसात 'पोडू' असे नाव आहे. ही 'पोडु' शेती करण्यात कोलाम ही जात आरंभापासुन अग्रेस असावी, असे वाटते. कारण त्यांची शेती व घरे जवळजवळ असत आणि (त्यांच्या शेतीजवळच्या) त्यांच्या वस्तीला पोड असे अजुनही म्हणतात. त्यांची घरे गावाच्या दुरवर 'पोडा' नुसारच असतात. कोलामांच्या जुन्या पद्धतीचे हे अवशेष अलीकडे अगदीच कमी झाले आहेत. भावनेपेक्षाही या पद्धतीच्या अस्तित्वाला कोलामांचे दारिद्र्य अधिक कारण होते. आदिलाबादेकडील जंगली भागातच 'पोडू' शेतीचे अवशेष आहेत. अदिलाबाद जिल्ह्यातील तेलगु लोक कोलामांना 'मन्योड' असे म्हणतात. 'कोलाम' हे नाव तेलगु लोकांच्या तोंडी अहुदा नसतेच. कोलामांना काही भागात 'भुमक' असे म्हणतात. म्हणजेच भुमी करणारे या अर्थाने हा शब्द दृढ झालेला असावा.

'पोडू' शेती किंवा शेती हालविण्याची पद्धती कोलामांना फारशी कायदेशीर ठरलेली नाही. स्वराज्य पूर्वी यवतमाळ जिल्ह्यातील कोलामांच्या शेतीची स्थिती कशी होती याची कल्पना ग्रिक्सन यांच्या माहिती कडुन येते. ग्रिक्सन यांनी या भागातील गोड, आंध्र, कोलाम, बंजारा, गोवारी, गवळी इत्यादी लोकांच्या शेतीसंबंधी जी माहिती दिली, ती वरून कोलामांच्या माहितीची जमीनी घटत गेलेली दिसते. कोलाम जमातीचे अज्ञान व फसवणुक यांमुळेच इतर आदिवासी प्रमाणेच नामवले गेले ग्रामीण जीवणातील सावकार संस्थेने अज्ञानी शेतकऱ्यांना कफल्लक केल्याची असंख्य उदाहरणे त्याकाळी घडत. ग्रिक्सन यांच्या निरिक्षणानुसार 'वस्तुतः येथील आदिवासीची परिस्थिती काहीच सुधारली नाही. असे उद्गार काढले आहेत. भुदानात मिळालेली जमीन मीळाली याचा आनंद देणारी ठरली असली तरी ती जमीन देणाराने बरेचदा, जंगली व बरडखरड पाहुन दिलेली असते. यवतमाळातील ता. तीला सरपरधीची जमीन अशीच आहे. येथील जमीन उत्पादनक्षम नसल्याचा अभियान, तेथे मुख्यत्वाने व्यक्त केला आहे. अर्ध्यावेळेस अडचणींचे डोंगर असले तरी ही जमात कष्टामध्ये कसूर करीत नाही. कष्टापेक्षा मिळकत कमी असली तरी त्यांचे कष्ट चालूच असते.

यवतमाळ व वर्धा जिल्ह्यात कोलम शेतकरी कापुस पिकवितो नंतर. ज्वारी, तुर, भुग, पेरतो, किनवट, अदिलाबाद, वणी, चंद्रपुर या भागांत भाताची शेती करतात. उतनुर तालुक्यातील कोलाम तीळाची पिके उत्तम काढतो. परंतु एकंदरीत पावसाची 'झड' या लोकांना सोसावीच लागते. कारण झोपडी शिवाय एकाही कोलामांचे घर व्यवस्थित दिसत नाही दारिद्र्य यांच्या परिस्थितीच्या सोबतीला आहे. असे वाटते कोलाम शेतकरी किती आगतिक असु शकतात. याचे प्रत्युतर त्यांच्यातील 'अंतारी' नामक उत्सव प्रथेवरुन येते. वस्तीतील कोलम शेतकऱ्याला शक्य होत नसल्यास त्याची अडलेली कामे वस्तीचे इतर कोलाम सामुदायिक पणे त्याच्या शेतात कामाल जावून उरकून देतात. एका वस्तीत अश्या 'आताऱ्या' 2 ते 3 तरी होतात. 10 -12 कुटुंबात 2 ते 3 शेतकरी आगतिक व अती दारिद्र असतात. असेच हि उत्सवप्रथा सिद्ध करते.

**शेतमजुर :**

कोलामांचा संबंध मुख्यतः शेतीशी अधिक येतो; मग तो शेती करण्याच्या निमित्ताने असो, कि शेतमाल या नोकरीच्या निमित्ताने असो, कि शेतमजुरीच्या निमित्ताने असो. स्वतःशेती करणाऱ्या कोलामांपेक्षा शेतमजुर कोलाम संख्या अधिक आहे.

शेतमजुरांचा प्रश्न खेड्यापाड्या अलीकडे कठीण झालेल असल्यामुळे कोलामांनाही काहीशी शेतमजुरी मिळू लागली आहे. मात्र रोज मजुरीचे दर गरजेनुसार कमीजास्त होतात. तर बाराहिमहीने शेतीची

कामे सर्वांना मीळत नाही. पेरणीच्या हंगामात पेरण्यासाठी काही स्त्रीपुरुषांची गरज असते. कोलाम पुरुषांबरोबर कोलाम स्त्रिया खांद्याला खांदा लावून कष्टाचे काम करतात. एकंदरीत पुरुषाचे कामे संपलील परंतु स्त्रीयांचे सुरुच असतात. रोजंदारीने शेतकामावर जाणाऱ्या स्त्रियांना सर्व भागात सारखी मजूरी मिळतेच असे नाही. खेड्यापाड्यात कोलमितर शेतक-यांकडे (एखाद दुसर) नौकर शेतीकामासाठी असतो. कोलामांमधील स्वतःची शेती नसलेले कोलाम अशा शेतकऱ्यांकडे नौकरीला राहतात. नौकरास सकाळ पासून संध्याकाळपर्यंत काम करावे लागते. शेतीकाम मुख्य असते.

**मजुरीची इतर कामे :**

काही कोलाम शेतीच्या कामांवर रोजंदारीने जातात. कोलाम जमातीत शेतमजूर अधिक असले तरी ते केवळ शेतमजूर म्हणून बाराही महिने जगू शकत नाहीत अशा वेळी इतर व्यवसाय जोड -कामांचे स्वरूपही विविध असे आढळते, कोलामांच्या अशा जोड – मजुरीचे व्यवसायांचे प्रकार साधारणतः पुढे वर्णिल्या प्रमाणे आढळतात.

1) **गुरे वळणे** :- शेतकऱ्यांच्या गायी, म्हशी, शेळ्या बकऱ्या चरायला नेण्याची कामे गुराखी करतात जोडधंदा म्हणून ही कामे करतात.

2) **शेतीतील 'खोडे' काढणे** :- पडीत जमीनीला मशागत करून लागवडीस आणणे हे दुरुस्त कर्म होय. त्या जमिनीत अनेक झाडे वाढलेली असतात. त्यांची मुळे कापुन त्यातील जमिनीतील ‘खोडे' काढण्यासाठी अंगमेहनतीचे कामे करावी लागतात.

3) **बांध घालणे** :- अलीकडे शेतीत बांध घालण्याचे व त्यासाठी जमीन खणण्याचे काम सरकारी पद्धतीने होवु लागले आहे. या कामावर काहीं कोलाम जातात. शेताच्या बांधाच्या एरवी होणाऱ्या कामांवरही हे लोक जातात.

4) **बैलगाडी भाडे** :- आधीच्या शेतकऱ्यान जवळ बैल व बैलगाड्या होत्या शेतीमध्ये व शेतमजुरीत जम न बसलेले क्वचित कोलाम भाड्याने स्वतःच्या बैलगाडीतुन लोकांच्या मालाची ने-आण करतात.

5) **खोदकाम, दगड - फोडरी तट्टे विकणे** :- दगड फोडणे, गिड्डी फोडणे, विहिरी खोदणे, घराचे पाये खोदणे व भरणे अश्यातऱ्हेची काम काही कोलाम करतात. काही हंगामात शेतकरी व गावकरी यांना घरांसाठी व मांडवांसाठी तुराखापर्यांचे ‘कडे’ किंवा तट्टे हवे असतात. ती तथ्ये कोलाम विणून विकणार व आपली उपजीविका भागवितात.

6) **खाडा, दोर, वाख इ. कामे** :- पुर्वी खेड्यापाडयात खास विणण्याची कला बहुतेकांना अवगत असे. कोलाम लोकांना ही कला उत्तमरीत्या अवगत होती. खाटा हि खेड्यांची आजही गरज आहे. खाली झोपणे अपमानाचे आहे असे खेड्यातील लोक समजतात. गावामध्ये खाद्य विणून आपली मजुरी घेतात. दोर तयार करणे, अश्या अनेक कामांमधुन ते आपली उपजिवीका भागवीतात. गावात काम मिळाले नाही तर दूरच्या किंवा शेजारच्या गावी काम शोधण्यासाठी जायची तयारी अलीकडे हे लोक ठेवतात.

शेतमजुरीव्यतिरिक्त रिकाम्या दिवशी पुरुषांप्रमाणेच स्त्रियाही कष्टाची अनेक कामे करतात. काही कामे स्त्रिया आणि पुरुष हे दोघेही करतात. अदिलाबाद जिल्ह्यात टोपल्या विणण्याचे काम कोलामांमध्ये फार चालते. उतनुर तालुक्यातील कोलाम स्त्रीपुरुष सुंदर टोपल्या विणतात. इदरवल्ली (ता. उतनुर) या खेड्यातील कोलाम स्त्रीपुरुष बांबुच्या टोपल्या व चट्या विणण्यात वाकबगार असून त्या गावी तो या लोकांचा जोडधंदा असल्याचे दिसले.

**जंगली वस्तुंचे उत्पन्न काढणे :**

जंगलातील लाकूड तोडणे, मालढेल भरणे लाकडी कोळश्याच्या भट्यावर राबणे इ. कामे कोलाम पुरुष प्रामुख्याने करतात. लाकडी कोळश्याच्या भट्यावर लाकडे जमविणे, पाणी आणणे अशी कामे कोलाम स्त्रिया करतात. जंगलाचा कानाकोपरा यांना

माहित असतो. व जंगली जनावरांना हि लोक भीत नाही. अधिकारापासून हि जमात सर्वप्रथम 'वन्य' आहेत. त्यानंतर ते वन्य व्यावसायी झालेत.

जंगलातील गवत कापणे व त्या गवताचे भारे तयार करुन ते शेजारच्या मोठया गावी नेवून विकते. हा त्या लोकांचा सर्वात आवडता असा पारंपारिक व्यवसाय आहे. त्यातील बरीचशी मराठी मराठी-गोंडी, मराठी-कोलामी, गोंडी-कोलामी हि लोग सुद्धा हि कामे आवडीने करतात. हि लोक इंधनाच्या मोळ्या विकणे हा धंदा जोड धंदा म्हणून करतात. स्वतःची घरे छावण्यासारखी गवतकाडी आणावी लागतेच तेव्हा ही कामे सुद्धा त्याच कारणाने होऊन जातात.

उन्हाळयात चारे, व टेंभरे ही वन्य फळे जंगलातुन आणुन मोठ्या गावांमध्ये विकण्याचे काम कोलाम करतात. अनेक झाडांचा डिंक या जमातीतील स्त्रीया गोळा करतात. जसे बाभुळ, धावडा, आजन इ. झाडांचा डिंक जमा करतात. कोणत्या झाडांचा डिंक किमती असतो हे त्यांना अनुभवाने येते. चारांची चारोळी तयार करने, काव्यांची गोळंबी काढण्यात कोलाम स्त्रीया उन्हाळ्यात गुंतलेल्या दिसतात.

मोहाची झाडे लावतात व त्यापासुन मोह वेचून हे लोक त्यांचा उपयोग खाण्यासाठी आणि दारूसाठी करीत असतात मोहापासुन दारू काढणे हा त्यांचा जोडीधंदा आहे. परंतु यावर सरकारी बंधने असल्यामुळे हा प्रकार बंद करण्यात आला. तसेच उदरनिर्वाहासाठी कंदमुळे व वनस्पती यांचा वापर हे लोक कधी कधी करतात. जंगली वनस्पतींचे औषधी उपयोग यांच्यापैकी अनेकांना अवगत असतात. जंगली भागात राहत असल्यामुळे मधाच्या पोळ्याचे अनेक प्रकार यांना ठाऊक असते. जसे साडेमोहोळ आगेमोहोळ कातेमोहोळ यातपुढे मोहोळ इ. त्यामुळेच मधाच्या पोळयातून मध जमा करून शहरात जाऊन विकतात हा सुद्धा त्यांच्या उत्पन्नाचा एक भाग होतो.

विजेचे व्यसन सर्वत्र असल्यामुळे आजकाल हा धंदा मोठ्या प्रमाणावर चालतो. बिड्या वळण्यासाठी कारखान्यांना टेंभुर्णीची झाडांची पाने पुरविण्यासाठी जंगली भागात ही पाने गोळा करण्याचा व्यवसाय काही लोक करतात.

आर्थिक संदर्भात डॉ. इरावती कर्वे यांनी लिहिले आहे की हे जरी अरण्यात असले तरी गावकऱ्यांशी शतकान शतके सहचर्य आहे. गावांवर अवलंबून असलेले शिकारी असे त्यांचे वर्णन या समाजशास्त्रने केले आहे.

**शिकार :**

रिकाम्या वेळेस शिकारीस जाणे हे कुलामांचे एक आगळे वैशिष्ट्य आहे. सामुदायिक शिकार करण्याची कोलामांची परंपरा आहे. शिकारीस जाण्यापूर्वी वस्तीमध्ये दवंडी पिटवून चावडी पुढे सर्व पुरुषांना जमविले जात होते तसेच स्त्रिया बाहेर निघत नव्हत्या. शिकारीला गेलेले पुरुष दोन दोन दिवस शिकारीस गुंतून राहत होते. कधी शिकारच रानात भाजून खायचे. व पुन्हा शिकार करायची अशी ह्यांची प्रथा होती. फणमोडी हा कोलामांचा सण भूमिपूजा व शिकार या दोन कामांसाठी साजरा होत होता. मोहडोंबरी या सणात मोह आणि चारोळी या वन्य वस्तूचा मान असतो. कोलामांची पारध्याक ही देवता शिकारीची म्हणून प्रसिद्ध आहे. वनदेवता बाघाई हीचही उल्लेख आढळतो. कुलामा इतकी रानडुकरांच्या मागे सुसाट पळून शिकार करणारी दुसरी जात नाही. डुकरांपासून तर अनेक प्राणी व पक्षी यांची सुद्धा शिकार ते करतात डुकरे रोही हरणे यांना विटाळून लावण्यासाठी ते कुत्र्याची सोबत घेतात.

**मुख्य गृहउद्योग :**

**सुतारकाम :**

कोलामांचा गृह उद्योग फक्त सुतारकाम हा असून तो पूर्वापार चालत आलेला आहे लाकुडफाट्यांशी जंगलामुळे संबंध येणाऱ्या कोलामांच्या विश्वात सुतार वैपुल्ल्याने आढळून असली तरी लोहार मात्र तुरळक आढळतात धातुंशी या जमिनीचा संबंध एकंदरीत कमी येतो असे दिसते.

**व्यापार धंदा :**

व्यापार धंदा कोलामांना रस नाही. ते शहर दुकानदारांकडे नोकरी करतात पण आपले एखादी छोटीशी दुकान टाकीत नाही. याला कारण ही तसेच आहे. ते म्हणजे शिक्षण नाही. ही या जमिनीची अगतिक शोकांतिका आहे. कारण शिक्षण नाही तर पिढ्यापिढ्यांनी पारंपारिकच कामे करावी लागतील. अन्यथा सामाजिक प्रगती होणार नाही तसेच या जमातीमध्ये क्वचितच कुणी शिकलेले आढळते शिक्षण नाही तर हिशोब नाही तेव्हा इतरांच्या दुकानांमध्ये अंगमेहनतच करावी लागते.

**बांधकाम वाहतूक तांत्रिक व इतर व्यवसाय :**

बांधकाम करणे म्हणजे सडकांचे बांधकाम घरांचे बांधकाम व इतर क्षेत्रातील बांधकाम ही जमात करीत असते क्वचितच लोक वाहतूक विभागात व तांत्रिक विभागात कार्यरत आहेत तेही नोकर म्हणूनच इतर व्यवसायातील लोक पहिली दुसरी किंवा चौथी सातवी शिकलेले आहेत शिक्षणाचे प्रमाण अगदीच अल्प आहे. त्यामुळे त्यांच्याकडे चांगल्या पदांच्या नोकऱ्या नाहीत नोकरीमध्ये जाणारी मंडळी अगदी अलीकडची व तुरळ आहे इतर जमातीच्या मानाने अशा लोकांची संख्या अगदीच निराशा जनक आहे ही मात्र या जमातीची वस्तुस्थिती आहे.

**समारोप :**

कोलामांच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेतला असता कोलामांच्या व्यवसायांचे जे निरीक्षण घेतली आहे त्यावरून असे दिसते की ही जमात आर्थिक दृष्ट्या कमालीची मागासलेली आहे भटक्या जमातीमध्ये गुलाम या जमातीचा क्रम आर्थिकतेत व सुधारणेत शेवटचा आहे हे मत वास्तव असेच आहे.

अनेक अंग मेहनतीचे कामे करून ही लोक आपली उपजीविका भागवतात आठवडी बाजारात विविध वस्तू विकून काही खाद्यपदार्थ संध्याकाळी आपल्या घरी घेऊन जातात यांची आर्थिक स्थिती हालाखीची असते तेव्हा या कोलाम जमातीचे आर्थिक वस्तुस्थिती अजूनही कायम आहे.

**संदर्भसूची :**

1) सेवा प्रकाशन, अमरावती, डॉ. भाऊ मांडवकर ‘कोलम’ प्रबंध.
2) साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रदीप आगलावे ‘आदिवासी समाजाचे समाजशास्त्र’